दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

जगातील सर्वोत्तम फ्राइड चिकनच्या यादीत 'चिकन 65'

मुंबई : भारतीय खाद्यपदार्थांची चव जगभरात लोकप्रिय आहे. आता भारतातील प्रसिद्ध 'चिकन 65' या पदार्थाने जगभरातील फ्राइड चिकनच्या पाककृतींच्या यादीत अव्वल स्थान मिळवल्याचा दावा करण्यात आला आहे. खाद्यसंस्कृती आणि पदार्थांचे परीक्षण करणाऱ्या टेस्टअॅटलसने ही यादी प्रसिद्ध केली आहे. भारतासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे. चिकन 65 हा तामिळनाडूतील चेन्नई येथे लोकप्रिय झालेला मसालेदार चिकनचा पदार्थ आहे. चिकनचे छोटे तुकडे दही, आले-लसूण पेस्ट, लाल मिरची आणि विविध मसाल्यांमध्ये मॅरीनेट केले जातात.

आ.नाना पटोले यांचा नांदेड दौरा

नांदेड : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष तथा साकोली (जि. भंडारा) विधानसभा मतदारसंघाचे आमदार नाना पटोले हे दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते माहूर, नांदेड, मुदखेड आणि बिलोली तालुक्यांतील विविध धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. दि.२३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ०६.३० वा. रहाटे कॉलनी, नागपूर येथील निवासस्थानावरून नांदेड जिल्ह्यातील माहूरकडे प्रयाण सकाळी ०९.०० वा रेणुकामाता मंदिर, माहूर येथे दर्शन दुपारी १२.०० वा.- नांदेड येथील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेस उपस्थिती.

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

राज्यमंत्री रामदास आठवले 23 नोव्हेंबर रोजी परभणी दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी: केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचे राज्यमंत्री रामदास आठवले हे सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्याच्या नियोजित कार्यक्रमानुसार, सकाळी १० वाजता वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) येथून प्रस्थान केल्यानंतर दुपारी १२.३० वाजता त्यांचे परभणी शहरातील भीमनगर येथे आगमन होईल. यावेळी ते दिवंगत माधवराव हटागळे यांच्या शोकसभेत सहभागी होतील. त्यानंतर दुपारी १.४५ वाजता परभणी येथील शासकीय विश्रामगृहात समाजकल्याण अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेणार आहेत. दुपारी २.४५ वाजता ते परभणीतून पंढरपूरकडे प्रयाण करतील. रात्री ८.४५ वाजता पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहात त्यांचे आगमन होणार असून, तेथे त्यांचा मुक्काम राहणार आहे.

मुंबई पोलिसांना मिळणार QR कोड असलेले स्मार्ट ओळखपत्र

मुंबई : पोलीस अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या तोतया पोलिसांना आळा घालण्यासाठी मुंबई पोलिसांनी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना आता QR कोड असलेली स्मार्ट ओळखपत्रे दिली जाणार आहेत. नागरिक आपल्या स्मार्टफोनद्वारे हा QR कोड स्कॅन करून संबंधित व्यक्ती खरोखर पोलीस दलात कार्यरत आहे की नाही, याची खात्री करू शकतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन

मुंबई पोलीस दलाच्या डिजिटल व्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी या योजनेचे उद्घाटन केले. यावेळी वाहतूक पोलिसांसह काही पोलीस कर्मचाऱ्यांना स्मार्ट ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले.

QR कोड स्कॅन करताच मिळणार अधिकाऱ्याची माहिती

नवीन स्मार्ट कार्डवर संबंधित पोलीस कर्मचाऱ्याचे छायाचित्र आणि स्वतंत्र QR कोड असेल. नागरिकांना मुंबई पोलीस सिटीझन ॲपच्या माध्यमातून हा कोड स्कॅन करता येईल. त्यानंतर अधिकृत पडताळणी प्लॅटफॉर्मवर संबंधित अधिकाऱ्याचे छायाचित्र, नाव, सेवेत रुजू झाल्याची तारीख आणि सध्याची नियुक्ती यांसारखी माहिती दिसेल. नागरिक या माहितीची ओळखपत्रावरील तपशिलांशी तुलना करून संबंधित व्यक्तीची ओळख पडताळू शकतील. त्यामुळे पोलीस असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिक, व्यापारी आणि इतर नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या भामट्यांना आळा घालण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

मामाच्या मुलीशी विवाह करण्याची प्रथा बंद होणार? सुप्रीम कोर्टात याचिकेमुळे चर्चा सुरू

नवी दिल्ली : रक्ताच्या नात्यातील जवळच्या नातेसंबंधांमधील विवाहामुळे जन्माला येणारी नवी पिढी यांबाबत आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे याबाबत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. बेंगळुरू येथील एका दृष्टिहीन विद्यार्थ्याने अशा विवाहांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. त्यासोबतच जनजागृती वाढवण्याचे आवाहनही केले आहे. न्यायालयाने केंद्र सरकारकडून यासंदर्भात उत्तर मागितले आहे, तसेच हे स्पष्ट केले आहे की, या विषयावर कायदा करण्याचा अधिकार विधिमंडळाच्या अखत्यारीत येतो. परंतु सध्या तरी, देशभर अशी कोणतीही बंदी लागू करण्यात आलेली नाही.

तसेच सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने असेही नमूद केले की, न्यायालय 'रक्ताच्या नात्यातील विवाहांचे' नियमन करू शकत नाही.

बऱ्याच ठिकाणी ग्रामीण भागात अधिकतर नात्यात मामाच्या मुलीशी विवाह केला जातो. किंवा इतर रक्ताच्या नातेसंबंधनात विवाह केला जातो. ही विविह पद्धत प्रतिबंधित कलेची जाऊ शकते का? सर्वोच्च



न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेमुळे या प्रश्नावर नवीन कायदेशीर चर्चा सुरू झाली आहे. या पद्धतीमुळे पुढच्या पिढीच्या आरोग्यावर होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेता, याचिकाकर्त्याने या विषयावर कायदा करण्याची मागणी केली आहे. बेंगळुरू येथील एका दृष्टिहीन विद्यार्थ्याने ही याचिका दाखल केली आहे. तसेच त्याने त्यातून उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक जोखमींबाबत जनजागृती मोहीम राबवण्याची विनंती देखील केली आहे.

याचिकाकर्त्याचा यासंदर्भात असे म्हणणे आहे की, रक्ताच्या जवळच्या नातेसंबंधांतील विवाहामुळे मुलांमध्ये काही अनुवांशिक आजार आणि जन्मजात दोष निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो. यामुळे अंधत्व, ऐकण्यातील दोष, जन्मजात शारीरिक व्यंग आणि बालमृत्यू यांसारख्या संभाव्य आरोग्यविषयक धोक्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. मात्र, संभाव्य आरोग्य धोके आहेत याचा अर्थ असा नाही की, अशा विवाहांमधून जन्मलेल्या प्रत्येक मुलाला नक्कीच काही आजार किंवा दोष असतीलच. महाराष्ट्रातही मामाच्या मुलीशी विवाह करण्याची प्रथा दिसून येते. विशेषतः विदर्भ प्रदेशाच्या संदर्भात या प्रथेवर बऱ्यापैकी संशोधन उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील विदर्भ भागात मामाच्या मुलीशी विवाह करण्याची परंपरा जास्त प्रमाणात आहे. एका प्रादेशिक अभ्यासानुसार, या भागात नातेवाईकांमध्ये होणाऱ्या विवाहांपैकी 74.04 % विवाह हे मामाच्या मुलीशी झालेले आहेत, ही आकडेवारी विदर्भात या प्रथेचे प्रमाण किती जास्त आहे, हे दाखवते.

भारत-न्यूझीलंड शताब्दी हॉकी मालिकेत भारताचा दणदणीत विजय

अंतिम सामना बरोबरीत सुटल्यानंतरही 1-0 ने मारली बाजी

मुंबई : भारतीय पुरुष हॉकी संघाने यजमान न्यूझीलंडविरुद्धची तीन सामन्यांची ऐतिहासिक 'भारत-न्यूझीलंड शताब्दी क्रीडा ऐक्य' मालिका 1-0 अशी खिशात घातली आहे. ऑकलंडमधील लॉईड एल्स्मोर हॉकी स्टेडियमवर रंगलेला मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरला आणि 2-2 अशा बरोबरीत सुटला. पहिल्या सामन्यातील विजयाच्या जोरावर भारताने मालिका विजयावर शिक्कामोर्तब केले.अंतिम सामन्यात यजमान न्यूझीलंडने आक्रमक सुरुवात करत नवव्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरच्या मदतीने पहिला गोल नोंदवला. डायलन थॉमसने हा गोल करत कीवी संघाला 1-0 अशी आघाडी मिळवून दिली. मात्र भारतीय संघाने या धक्क्यातून सावरत अवघ्या काही मिनिटांतच जोरदार मुसंडी मारली. 16 व्या मिनिटाला कर्णधार



संजय राणाने गोल करत भारताला 1-1 अशी बरोबरी साधून दिली. त्यानंतर अवघ्या दोनच मिनिटांनी, म्हणजेच 18व्या मिनिटाला सेल्वम कार्थीने शानदार मैदानी गोल करत भारताला 2-1 अशी आघाडी मिळवून दिली.

तिसऱ्या आणि चौथ्या क्वार्टरमध्ये भारतीय बचावफळीने न्यूझीलंडचे सर्व हल्ले परतवून लावत आपली आघाडी भक्कम ठेवली होती. मात्र, सामना संपायला केवळ पाच मिनिटे शिल्लक असताना 55 व्या मिनिटाला बेंजी कल्हेनने गोल करत न्यूझीलंडला 2-2 अशी बरोबरी साधून दिली. अखेरच्या मिनिटांत दोन्ही संघांनी विजयी गोलसाठी शर्थीचे प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही. दरम्यान, या मालिकेत भारताने पहिला सामना 3-2 ने जिंकला होता, तर दुसरा आणि तिसरा सामना बरोबरीत सुटला. त्यामुळे ही मालिका भारताने 1-0 ने आपल्या खिशात घातली.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील क्रीडा संबंधांच्या शतकपूर्तीनिमित्त या विशेष मालिकेचे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील क्रीडा संबंधांच्या 100व्या वर्धापन दिनानिमित्त या मालिकेचे अधिकृत नाव '2026 भारत-न्यूझीलंड शताब्दी क्रीडा ऐक्य स्पर्धा' असे ठेवण्यात आले होते. बरोबर 100 वर्षांपूर्वी, 1926 मध्ये मेजर ध्यानचंद यांचा समावेश असलेल्या भारतीय लष्कराच्या हॉकी संघाने न्यूझीलंडचा दौरा केला होता. न्यूझीलंडचा दौरा करणारा तो भारताचा पहिलाच संघ होता. त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ ही मालिका खेळवण्यात आली.

हैदराबादमध्ये 2 बॉम्बस्फोटांची धमकी; 300 जणांना ठार मारण्याचा इशारा

मुंबई : लष्कर-ए-तोयबा (LeT) या दहशतवादी संघटनेच्या नावाने कथितरित्या देण्यात आलेल्या धमकीनंतर हैदराबाद पोलिसांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शहरात दोन बॉम्बस्फोट घडवून किमान 300 जणांना ठार मारण्याचा कट असल्याची धमकी एका पत्रातून देण्यात आल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

हैदराबादमधील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात या धमकीचा उल्लेख करण्यात आला आहे. हैदराबाद शहर पोलीस सहआयुक्त (विशेष शाखा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, पत्र पाठवणाऱ्याने 18 नोव्हेंबर रोजी जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील झांगलपोरा येथे झालेल्या चकमकीचा संदर्भ दिला आहे.

या चकमकीत दक्षिण काश्मीरमधील लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी लतीफ भट ठार झाला होता. त्याच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी 26 नोव्हेंबर रोजी हैदराबादमध्ये मुंबईतील 26/11 दहशतवादी हल्ल्यासारखी घटना घडवण्याची धमकी पत्रात देण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

हॉटेल, रेल्वे स्थानकांसह गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवली

या धमकीनंतर काचीगुडा येथील हॉटेल टुरिस्ट प्लाझा आणि काचीगुडा रेल्वे स्थानकासह शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

अग्निवीरांसाठी दिलासादायक निर्णय; दोन वर्षांच्या सेवा मुदतवाढीदरम्यान विवाहाला परवानगी

मुंबई : अग्निपथ योजनेअंतर्गत सैन्यात भरती झालेल्या अग्निवीरांना दोन वर्षांच्या सेवा मुदतवाढीदरम्यान विवाह करण्याची परवानगी दिली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, यासाठी त्यांना दुसऱ्या 'टूर ऑफ ड्युटी'दरम्यानचे संक्षिप्त प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करावे लागणार आहे. नोंदणी केलेल्या अग्निवीरांना पाठवण्यात आलेल्या पत्राचा संदर्भ देत सूत्रांनी ही माहिती दिल्याचे वृत्त आहे.

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच विवाहाची परवानगी

अग्निपथ योजनेनुसार, भरतीच्या वेळी उमेदवार अविवाहित असणे आवश्यक आहे. तसेच सुरुवातीच्या 4 वर्षांच्या सेवा कालावधीत त्यांना विवाह करता येत नाही. आता दोन वर्षांच्या मुदतवाढीचा पर्याय निवडणाऱ्या अग्निवीरांसाठी या नियमात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रवेश घेतल्यानंतर अग्निवीरांना काही काळाच्या विश्रांतीनंतर सुमारे 4 आठवड्यांचे संक्षिप्त प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना विवाह करण्याची परवानगी दिली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

2022 मध्ये सुरू झालेल्या अग्निपथ योजनेअंतर्गत जवानांची सुरुवातीची सेवा 4 वर्षांची असते. या कालावधीनंतर 25 टक्के अग्निवीरांची गुणवत्तेच्या आधारावर नियमित सेवेसाठी निवड केली जाते. उर्वरित पात्र अग्निवीरांना दोन वर्षांच्या 'सेकंड टूर ऑफ ड्युटी'चा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

राज्यातील 3,832 अंगणवाड्या होणार स्मार्ट; मुलांना मिळणार आधुनिक शिक्षण




मुंबई : राज्यातील अंगणवाड्यांचं चित्र आता बदलणार आहे. अंगणवाडी केंद्रात मिळणाऱ्या सेवांमध्ये आधुनिक शैक्षणिक साहित्य आणि पायाभूत सुविधांची भर घालत ३,८३२ अंगणवाड्यांना 'स्मार्ट अंगणवाडी' करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. अंगणवाडी केंद्रांमधून ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पोषण, आरोग्य आणि पूर्वप्राथमिक शिक्षण दिलं जातं. तसेच गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना पोषण व आरोग्याशी संबंधित सेवा दिल्या जातात. ही केंद्रं अधिक आकर्षक, सुरक्षित आणि आनंददायी व्हावीत, यासाठी स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबवली जात आहे. शासकीय जागेत असलेल्या आणि जिथे वीज जोडणी उपलब्ध आहे, अशा केंद्रांचा यामध्ये विचार करण्यात आला आहे. अशा ३,८३२ केंद्रांना स्मार्ट करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाड्यांना स्मार्ट किट दिलं जाणार आहे. यामध्ये ई-लर्निंगसाठी लागणारं हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर असणार आहे. त्यामुळे लहान मुलांना खेळातून, गाणी, गोष्टी आणि चित्रांमधून शिकणं अधिक सोपं होणार आहे. याशिवाय स्वच्छ भारत किट, वॉटर प्युरिफायर, हात धुण्यासाठी बेसिनची सुविधा दिली जाणार आहे. अंगणवाडी इमारतीला रंगरंगोटी केली जाणार आहे. इमारतीची आवश्यक किरकोळ दुरुस्ती, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि स्वयंपाकघराचं आधुनिकीकरणही यामध्ये समाविष्ट आहे. अंगणवाडी केंद्रातील सुविधा आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी टप्प्याटप्प्याने स्मार्ट अंगणवाड्यांची निर्मिती केली जात आहे. मुलांच्या पोषण, आरोग्य आणि सुरुवातीच्या शिक्षणासाठी अधिक गुणवत्तापूर्ण वातावरण तयार करण्याचा प्रयत्न असल्याचं मंत्री तटकरे यांनी सांगितलं.

पूर्वी अंगणवाडी म्हणजे फक्त पोषण आहाराचं केंद्र असं चित्र होतं. आता मात्र ते मुलांच्या सर्वांगीण विकासाचं केंद्र बनत आहे. स्मार्ट अंगणवाडीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब कुटुंबातील मुलांनाही चांगल्या सुविधा मिळणार आहेत. शिक्षणाची गोडी लहानपणापासूनच लागावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

भाजपचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचे निधन; 24 नोव्हेंबर रोजी हिंगोलीत अंतसंस्कार

हिंगोली | भाजपचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. चालताना त्रास जाणवल्याने ते स्वतःहून रुग्णालयात दाखल झाले होते.

मात्र उपचारादरम्यान मध्यरात्री त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. रामराव वडकुते हे धनगर समाजाचे महत्त्वाचे नेते म्हणून ओळखले जात होते. अवघ्या आठ महिन्यांपूर्वीच त्यांना भाजपने राज्यसभेवर संधी दिली होती. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. रामरावजी वडकुते साहेब यांना उपचारासाठी २० नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्ली येथील एम्स (AIIMS) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी २१ नोव्हेंबर रोजी अचानक त्यांची प्रकृती खालावली आणि रात्री त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कारासंदर्भातील नियोजन जाहीर करण्यात आले आहे. सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी त्यांचे पार्थिव छत्रपती संभाजीनगर येथे आणण्यात येणार आहे. त्यानंतर परभणी येथील कल्याणनगरमधील निवासस्थानी सकाळी १०.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत अंत्यदर्शनासाठी पार्थिव ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर पार्थिव हिंगोली येथे आणण्यात येईल.

मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हिंगोली येथील महाकाली नगर, अकोला बायपास येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी विधानसभा मतदारसंघात त्यांचे मोठे कार्य होते. माजी आमदार म्हणूनही त्यांची ओळख होती. 2004 च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळाली होती, मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. 2009 मध्ये त्यांना तिकीट नाकारण्यात आले होते. त्यानंतर 2014 मध्ये राष्ट्रवादीने त्यांना विधानपरिषदेवर पाठवून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. 2019 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी वडकुते यांनी राष्ट्रवादीतून भाजपमध्ये प्रवेश केला. 2021 मध्ये त्यांची हिंगोली भाजप जिल्हाध्यक्षपदी निवड झाली. हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे भाजप निवडणूक प्रमुख आणि प्रभारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. सात वर्षांनंतर रामराव वडकुते यांना भाजपने राज्यसभेवर संधी दिली होती.





दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

मुंबईच्या रस्त्यांवर ऐतिहासिक चाकांची शाही मिरवणूक

आधुनिक आणि अतिवेगवान युगात धावणाऱ्या मुंबईच्या रस्त्यांवर रविवारी एका अत्यंत देखण्या आणि ऐतिहासिक सोहळ्याचे दर्शन घडले. मर्सिडीज-बेंझ इंडिया आणि ऑटोकार इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'मर्सिडीज-बेंझ क्लासिक कार रॅली २०२६' ने वाहनप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडले. वांद्रे येथील ताज लँड्स एंड येथे राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते या रॅलीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. मर्सिडीज-बेंझच्या १४० वर्षांच्या गौरवशाली ऑटोमोबाईल इतिहासाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला हा सोहळा केवळ जुन्या मोटारगाड्यांचे प्रदर्शन नव्हता, तर तो अभियांत्रिकी कौशल्य, कलात्मकता आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा एक स्तुत्य उपक्रम ठरला. या रॅलीमध्ये देशभरातील दुर्मीळ आणि आकर्षक अशा ऐतिहासिक मर्सिडीज-बेंझ गाड्यांचा ताफा सहभागी झाला होता. मात्र, या संपूर्ण सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण ठरली ती भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रवासासाठी वापरलेली ऐतिहासिक मर्सिडीज-बेंझ मोटारगाडी. स्वतंत्र भारताच्या अनेक ऐतिहासिक क्षणांची साक्षीदार असलेल्या या गाडीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. खुद्द परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनाही या ऐतिहासिक गाडीसोबत छायाचित्र काढण्याचा मोह आवरता आला नाही. प्रत्येक क्लासिक कारची तांत्रिक रचना, तिची निर्मिती आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेताना त्यांनी व्यक्त केलेली उत्सुकता ही जुन्या काळातील ऑटोमोबाईल तंत्रज्ञानाप्रति असलेला आदर दर्शवणारी होती. या प्रसंगी मंत्री सरनाईक यांनी मांडलेला विचार अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील आहे. मर्सिडीज-बेंझ ही केवळ आलिशान गाडी नसून ती सुरक्षितता, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचे प्रतीक आहे, आणि असाच सुरक्षित व सुखकर प्रवास हा आपल्या देशातील सर्वसामान्य नागरिकांचेही स्वप्न आहे, असे त्यांनी नमूद केले. २०१४ पासून सातत्याने भरवली जाणारी ही रॅली जुन्या काळातील तंत्रज्ञानाचा हा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे मोलाचे कार्य करत आहे. एका बाजूला आपण भविष्यातील इलेक्ट्रिक आणि अत्याधुनिक वाहनांकडे झेप घेत असताना, भूतकाळातील या सोनेरी ऑटोमोबाईल परंपरेची जपणूक करणे हे तितकेच आवश्यक आणि प्रेरणादायी आहे.

मुंबई सेंट्रलमध्ये इमारतीला भीषण आग; 8 जणांची सुखरूप सुटका

मुंबई : मुंबई सेंट्रलमधील गिल्डर लेन येथील एका निवासी इमारतीला रविवारी मध्यरात्रीनंतर भीषण आग लागली. या आगीत वृद्ध महिला आणि दोन मुलांसह ८ जणांना सुखरूप वाचवण्यात आलं. आग विझवताना अग्निशमन दलाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हाताला दुखापत झाली आहे. ही आग मुंबई अग्निशमन दलाला रात्री १२.०७ वाजता कळवण्यात आली. हीरा मंझिल नावाच्या तळमजला अधिक तीन मजली इमारतीत आग लागली होती. ही इमारत रिलायन्स सुपरमार्केटजवळील नवजीवन सोसायटीशेजारी आहे. आग दुसऱ्या मजल्यावरील खोल्यांमध्ये पसरली होती. यामध्ये इलेक्ट्रिक वायरिंग, फर्निचर आणि घरातील इतर साहित्य जळून खाक झालं. अग्निशमन दल पोहोचलं तेव्हा अनेक रहिवासी तिसऱ्या मजल्यावर आणि टेरेसवर अडकले होते. अग्निशमन दलाच्या माहितीनुसार, तिसऱ्या मजल्यावरून एक पुरुष आणि दोन महिला अशा तिघांना टर्नटेबल लॅडरच्या मदतीने वाचवण्यात आलं. एका वृद्ध महिलेला पहिल्या मजल्यावरून जिन्याच्या मार्गाने बाहेर काढण्यात आलं. तर चौथ्या मजल्यावरून एक पुरुष, एक महिला, एक मुलगा आणि एक मुलगी अशा चौघांना जिन्याने सुखरूप खाली आणण्यात आलं. आगीची सुरुवातीला रात्री १२.२३ वाजता लेव्हल १ म्हणून नोंद करण्यात आली होती. त्यानंतर रात्री १२.५० वाजता ती लेव्हल २ वर गेली. आग विझवण्याचं काम कित्येक तास सुरू होतं. पहाटे ५.०५ वाजता आग आटोक्यात आली. या आगीत इलेक्ट्रिक उपकरणं, लाकडी फर्निचर, पार्टिशन, कपाटं, बेड, दरवाजे, खिडक्या, सीलिंग फॅन, स्प्लिट एसी, टीव्ही, कागदपत्रं आणि घरातील इतर साहित्याचं मोठं नुकसान झालं आहे.

पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञान : रोजगार, संशोधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे करिअर!

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) : ज्ञान, विज्ञान आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारी आश्वासक वाटचाल

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेती पशुसंवर्धन क्षेत्राच्या भक्कम साथीने अधिक सक्षम होऊ शकते. शेतीतील अनिश्चितता, हवामान बदल, पाणीटंचाई आणि कृषिमालाच्या बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, मत्स्यपालन आणि अन्य पशुधनावर आधारित व्यवसाय हे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण पर्याय ठरत आहेत. या सर्व क्षेत्रांच्या केंद्रस्थानी पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञान आहे. आजच्या तरुणाईसमोर अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानासारखे अनेक करिअर पर्याय असले, तरी पशुवैद्यकीय विज्ञान आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील अफाट संधींकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नाही. प्रत्यक्षात पशुआरोग्य, अन्नसुरक्षा, दूध व मांस उत्पादन, मत्स्यव्यवसाय, जैवसुरक्षा, रोगनियंत्रण आणि ग्रामीण उद्योजकता या सर्वांचा पशुवैद्यकीय विज्ञानाशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे हे क्षेत्र केवळ प्राण्यांच्या उपचारापुरते मर्यादित नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाशी थेट जोडलेले आहे.

पशुवैद्यकीय विज्ञान म्हणजे केवळ आजारी जनावरांवर उपचार करणे नव्हे. पशुआरोग्य, रोगनिदान, प्रतिबंधात्मक लसीकरण, शस्त्रक्रिया, प्रजनन व्यवस्थापन, पोषण, अनुवंशिक सुधारणा आणि प्राणी कल्याण अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबींचा त्यात समावेश होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, जनुकीय संशोधन, आधुनिक निदान पद्धती आणि डिजिटल आरोग्य व्यवस्थापनाच्या प्रगतीमुळे या क्षेत्रात नवनवीन क्षितिजे खुली होत आहेत. मानवी आरोग्य, प्राणी आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य हे परस्परांशी जोडलेले आहे. याच जाणिवेतून जागतिक स्तरावर 'वन हेल्थ' ही संकल्पना महत्त्वाची ठरली आहे. प्राण्यांपासून मानवांमध्ये पसरणारे आजार, अन्नसुरक्षा, प्रतिजैविकांचा जबाबदार वापर आणि संसर्गजन्य रोगांचे प्रतिबंध व नियंत्रण यामध्ये पशुवैद्यकीय तज्ज्ञांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) हे महाराष्ट्रातील पशुवैद्यकीय विज्ञान, दुग्ध तंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. सन २००० मध्ये स्थापन झालेल्या या विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणाला चालना देणे हा विद्यापीठाचा प्रमुख उद्देश आहे. नागपूर, मुंबई, परभणी, उदगीर, शिरवळ आणि अकोला येथे पशुवैद्यकीय महाविद्यालये कार्यरत आहेत. तसेच वरूड (यवतमाळ) आणि उदगीर येथे दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालये, तर नागपूर, मोर्शी आणि उदगीर येथे मत्स्यविज्ञान महाविद्यालये आहेत. याशिवाय नागपूर, सांगली आणि ठाणे येथे कृषी विज्ञान केंद्रे, नागपूरच्या गोरेवाडा येथे वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि व्हीआयपी रोड, नागपूर येथे पशुवैद्यकीय बहुविशेषोपचार व संशोधन केंद्र अशा संस्थात्मक सुविधांचे जाळे विद्यापीठाच्या कार्याला बळकटी देते. अलीकडेच खासगी संस्थांनाही संलग्नता देण्याचा मार्ग खुला झाल्यामुळे चालू शैक्षणिक वर्षापासून आणखी पाच पशुवैद्यकीय आणि तीन दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालये सुरू झाली आहेत. या सर्व संस्थांमधून शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणाच्या विविध उपक्रमांना चालना मिळत आहे.

पशुवैद्यकीय विज्ञान, दुग्ध तंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान या विषयांतील पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठ कुशल मनुष्यबळ घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. माफसू ची खरी ताकद केवळ पदव्या प्रदान करण्यात नसून विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा, पशुवैद्यकीय रुग्णालये, संशोधन केंद्रे, प्रक्षेत्रे आणि शेतकरी संपर्क कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभव देण्यात आहे. वर्गातील ज्ञानाचा प्रत्यक्ष क्षेत्रातील परिस्थितीशी मेळ घालणे आणि संशोधनाचा लाभ ग्रामीण पशुपालकांपर्यंत पोहोचविणे, हेच विद्यापीठाच्या कार्यक्षमतेचे खरे मापदंड असायला हवेत.

बारावी विज्ञान शाखेतून शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पशुवैद्यकीय आणि संलग्न विज्ञान क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यातील प्रमुख अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

१) बी.व्ही.एस्सी. अँड ए.एच.: पशुवैद्यकीय डॉक्टर होण्यासाठी हा प्रमुख पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी साडेपाच वर्षांचा असून त्यामध्ये एक वर्षाची अनिवार्य आंतरवासिता (इंटर्नशिप) समाविष्ट असते. यामध्ये प्राण्यांचे रोगनिदान, उपचार, शस्त्रक्रिया, पशुप्रजननशास्त्र, स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र, पशुपोषण, प्रजनन व्यवस्थापन आणि वन्यजीव आरोग्य व्यवस्थापन यांसह विविध विषयांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते.



२) बी.एफ.एस्सी.: या अभ्यासक्रमातून मत्स्यविज्ञान, मत्स्यपालन, जलसंवर्धन, मत्स्यप्रक्रिया उद्योग आणि मत्स्यव्यवसाय व्यवस्थापन या क्षेत्रांत करिअरच्या संधी उपलब्ध होतात.

३) दुग्ध तंत्रज्ञान : दूध संकलन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, शीतसाखळी व्यवस्थापन आणि दुग्ध उद्योगाचे संचालन यासाठी कुशल मनुष्यबळ तयार करणारा हा अभ्यासक्रम आहे.

४) पदव्युत्तर आणि संशोधन शिक्षण : एम.व्ही.एस्सी., दुग्ध तंत्रज्ञानातील पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि पीएच.डी. यांच्या माध्यमातून अध्यापन, संशोधन, रोगनिदान, पशुपोषण, अनुवंशशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत विशेष प्रावीण्य मिळविता येते.

प्रवेशासाठीची पात्रता, प्रवेश परीक्षा, आरक्षण धोरण, जागांची उपलब्धता आणि प्रवेश प्रक्रिया या बाबी अभ्यासक्रमानुसार वेगवेगळ्या असू शकतात. पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी NEET-UG आणि संबंधित प्रवेश प्रक्रियेची अद्ययावत माहिती अधिकृत प्रवेश माहिती पुस्तिका व माफसू च्या संकेतस्थळावरून तपासून घ्यावी.

पशुवैद्यकीय पदवीधरांना राज्याचा पशुसंवर्धन विभाग, शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालये, जिल्हा परिषदा, संशोधन संस्था, खासगी पशुवैद्यकीय दवाखाने, पशुवैद्यकीय औषधनिर्मिती कंपन्या, पशुखाद्य उद्योग, लस उत्पादन संस्था, रोगनिदान प्रयोगशाळा आणि शैक्षणिक संस्थांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. पदव्युत्तर आणि पीएच.डी. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधन, अध्यापन, वैज्ञानिक संस्था आणि विशेष व्यावसायिक सेवांमध्ये प्रगती करता येते. मत्स्यविज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी मत्स्यपालन प्रकल्प, मत्स्यबीज उत्पादन केंद्रे, मत्स्यप्रक्रिया उद्योग आणि जलस्रोत व्यवस्थापन या क्षेत्रांत संधी आहेत. दुग्ध तंत्रज्ञानाच्या पदवीधरांना दूध प्रक्रिया प्रकल्प, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन विकास आणि दुग्ध उद्योग व्यवस्थापनामध्ये काम करता येते. मात्र, पदवी मिळाली म्हणजे रोजगाराची हमी मिळाली, असे नाही. व्यावहारिक कौशल्य, व्यावसायिक अनुभव, संवादकौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि सातत्याने नवे शिकण्याची तयारी यांवरच दीर्घकालीन यश अवलंबून असते.

आजच्या तरुणांनी केवळ शासकीय नोकरीच्या प्रतीक्षेत न राहता स्वतःचा व्यवसाय उभारण्याचाही विचार करायला हवा. आधुनिक दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, पशुखाद्य निर्मिती, दूध प्रक्रिया, सेंद्रिय खतनिर्मिती आणि पशुधन सल्ला सेवा अशा अनेक क्षेत्रांत उद्योजकतेच्या आशादायक संधी आहेत. विदर्भासह महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि कुक्कुटपालनासाठी मोठी क्षमता आहे. मात्र, व्यवसाय सुरू करण्यापूर्वी बाजारपेठेचा अभ्यास, पशुधनाची निवड, रोगप्रतिबंध, खाद्य व्यवस्थापन, विमा, भांडवल आणि विपणन यांचे योग्य नियोजन आवश्यक आहे. शासकीय योजनांची माहिती, बँकिंग व कर्जसुविधा आणि तांत्रिक प्रशिक्षणाच्या मदतीने तरुण उद्योजक शाश्वत व्यवसाय उभारून आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करू शकतात.

पशुसंवर्धनाचे भविष्य आता पारंपरिक पद्धतींपुरते मर्यादित राहिलेले नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान, सेन्सर आधारित पशुआरोग्य निरीक्षण, डिजिटल पशुआरोग्य नोंदी, जनुकीय सुधारणा आणि प्रगत रोगनिदान पद्धतींमुळे या क्षेत्रात मोठे परिवर्तन घडत आहे. पशूंच्या आरोग्यातील बदलांची पूर्वसूचना देणारे तंत्रज्ञान, दूध उत्पादनाचे डिजिटल निरीक्षण, रोगप्रसार ओळखणाऱ्या प्रणाली आणि आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान यामुळे उत्पादनक्षमता व कार्यक्षमता वाढू शकते. येत्या काळात पशुवैद्यकीय विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान यांचा समन्वय अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. माफसू ने उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी विद्यार्थ्यांना जोडण्यासाठी संशोधनाला गती दिली पाहिजे. विद्यापीठाचे संशोधन केवळ शोधनिबंध आणि प्रयोगशाळांपुरते मर्यादित न राहता त्याचा प्रत्यक्ष लाभ शेतकरी, पशुपालक, मत्स्यव्यवसायिक आणि ग्रामीण उद्योजकांपर्यंत पोहोचला पाहिजे.

अध्यापन आणि संशोधनाइतकेच विस्तार शिक्षणही महत्त्वाचे आहे. विद्यापीठांनी विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाही, तर संशोधनाचे सामाजिक लाभ मर्यादित राहतात. पशुआरोग्य शिबिरे, लसीकरण मोहिमा, पशुपालक प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे आणि आधुनिक पशुसंवर्धन पद्धतींबाबत मार्गदर्शन या उपक्रमांना अधिक प्राधान्य दिले पाहिजे. विदर्भातील दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. अनेक ठिकाणी तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टर, आधुनिक उपचार सुविधा आणि वेळेवर वैद्यकीय मदत उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीत फिरत्या पशुवैद्यकीय सेवा, टेलिमेडिसिन आणि आपत्कालीन उपचार सुविधा प्रभावी ठरू शकतात. शेतकरी आणि पशुपालकांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन विद्यापीठाने संशोधनाचे प्राधान्यक्रम निश्चित केले पाहिजेत. प्रयोगशाळेतील ज्ञानामुळे शेतकऱ्यांचे आणि पशुपालकांचे उत्पन्न वाढते, तेव्हाच संशोधनाचे उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साध्य होते.

माफसू हे केवळ शैक्षणिक संस्थान नसून महाराष्ट्रातील पशुधन विकासासाठी महत्त्वाचे ज्ञानकेंद्र आहे. त्यामुळे काही मूलभूत बाबींना विशेष प्राधान्य देणे आवश्यक आहे. आधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालये, प्रगत रोगनिदान सुविधा, अनुभवी प्राध्यापक, पुरेसा संशोधन निधी आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या संधी अधिक सक्षम केल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, स्टार्टअप मार्गदर्शन आणि संशोधन प्रकल्प उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ आणि उद्योगक्षेत्रातील सहकार्य वाढविणे गरजेचे आहे. विद्यापीठातील माजी अधिकारी आणि माजी विद्यार्थ्यांचा अनुभवही रोजगारनिर्मितीसाठी व्यावसायिक संपर्कजाळे उभारण्यात उपयोगी ठरू शकतो. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी नव्हे, तर नावीन्यपूर्ण संशोधक, संवेदनशील पशुवैद्यकीय व्यावसायिक आणि प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधणारे सक्षम उद्योजक म्हणून घडविले पाहिजे. विद्यापीठाची प्रतिष्ठा केवळ पदव्यांच्या संख्येवर ठरत नाही; तर ते किती ज्ञान निर्माण करते, किती संशोधन करते आणि समाजासाठी किती संधी निर्माण करते, यावर ठरते.

तरुणांनी करिअर निवडताना केवळ सामाजिक प्रतिष्ठा किंवा वेतन यांचा विचार न करता स्वतःची आवड, क्षमता, वैज्ञानिक जिज्ञासा आणि समाजासाठी काहीतरी योगदान देण्याची भावना यांनाही महत्त्व दिले पाहिजे. पशुवैद्यकीय विज्ञानात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्राण्यांप्रती करुणा, संयम, निरीक्षणशक्ती, समर्पण आणि प्रत्यक्ष काम करण्याची तयारी असणे आवश्यक आहे. पशुवैद्यकीय डॉक्टर होणे म्हणजे केवळ पांढरा कोट परिधान करणे नव्हे; तर मुक्या प्राण्यांचे दुःख समजून त्यांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारणे होय. एखाद्या आजारी जनावराचे प्राण वाचविणे म्हणजे त्या जनावरावर अवलंबून असलेल्या संपूर्ण शेतकरी कुटुंबाच्या उपजीविकेचेही रक्षण करणे होय. त्यामुळे पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञानाकडे दुय्यम करिअर पर्याय म्हणून पाहण्याची मानसिकता बदलली पाहिजे. ज्ञान, संशोधन, रोजगार, उद्योजकता आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याची प्रचंड क्षमता या क्षेत्रात आहे.

महाराष्ट्राला ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल आणि पशुधनाचे आरोग्य सुरक्षित ठेवायचे असेल, तर पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञानाला विकासाच्या केंद्रस्थानी आणले पाहिजे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, अर्थपूर्ण संशोधन आणि प्रभावी विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून माफसू ने या परिवर्तनाचे नेतृत्व करणे आवश्यक आहे. शासनाने पुरेसा निधी, आधुनिक पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. विद्यापीठ प्रशासनाने शैक्षणिक गुणवत्ता आणि संशोधनाला प्राधान्य द्यावे, तर विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अध्ययन आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जागतिक स्पर्धेसाठी स्वतःला सक्षम बनवावे. आजचा पशुवैद्यकीय विद्यार्थी उद्याचा शास्त्रज्ञ, संशोधक, उद्योजक आणि ग्रामीण विकासाचा शिल्पकार ठरू शकतो. शेतीला पशुसंवर्धनाची साथ, विज्ञानाला संशोधनाची गती आणि तरुणाईला कौशल्याची ताकद मिळाली, तर आत्मनिर्भर महाराष्ट्राचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते!सक्षम माफसू, समृद्ध पशुसंवर्धन आणि सशक्त तरुणाई यांच्या एकत्रित प्रयत्नांतून ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळेल!

प्रवीण बागडे
साहित्यिक व सामाजिक विश्लेषक
नागपुर (मो. ९९२३६२०९१९)

वनामकृविचा पाच संस्थांसोबत भव्य सामंजस्य करार सोहळा उत्साहात संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**भागीदार संस्थांच्या यशोगाथा, पायाभूत सुविधा व प्रायोगिक क्षमतांचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि व विद्यापीठाच्या संचालकांद्वारा सखोल परीक्षण

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (वनामकृवि) येथे २८ व्या दीक्षांत समारंभानंतर दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित भव्य सामंजस्य करार सोहळ्यात विद्यापीठाने पाच नामांकित संस्थांसोबत शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास, कृषि रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI/ML), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) आणि कृषि उद्योजकता या क्षेत्रांत परस्पर सहकार्याचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार केले. या करारांमुळे विद्यार्थी, प्राध्यापक, शेतकरी आणि नवउद्योजकांसाठी तंत्रज्ञान विकास, कौशल्यवृद्धी, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यापूर्वी मागील सहा महिन्यांच्या कालावधीत प्रत्येक भागीदार संस्थेने आपापल्या यशोगाथा, उपलब्ध पायाभूत सुविधा, तांत्रिक क्षमता आणि प्रायोगिक कार्याचे स्वतंत्र सादरीकरण केले. या सादरीकरणांचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी सखोल व चिकित्सक परीक्षण केले. त्यानंतर प्रत्येक कराराची उद्दिष्टे, संबंधित संस्थांच्या जबाबदाऱ्या आणि अपेक्षित फलनिष्पत्ती निश्चित करण्यात आली. विशेष म्हणजे, हे सहकार्य पुढील तीन ते पाच वर्षांच्या कालावधीत नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

विद्यापीठाने पुढील पाच संस्थांसोबत हे सामंजस्य करार केले आहेत.

१. एमएसएमई टेक्नॉलॉजी सेंटर – इंडो जर्मन टूल रूम (IGTR), छत्रपती संभाजीनगर.

२. जगन्नाथ नवजीवन सेवाभावी संस्थेचे नवजीवन ग्रामीण व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र (NGVTC), परभणी.

३. अनावृक्ष (AnaVruksha), नाशिक – कृषि रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील नवउद्योजक कंपनी.

४. एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (MIT-ADT), पुणे.

५. टँट्रॉनिक्स इंडस्ट्रीज एलएलपी (Tantronics Industries LLP), पुणे – इलेक्ट्रॉनिक्स, एम्बेडेड सिस्टिम्स आणि औद्योगिक ऑटोमेशन क्षेत्रातील कंपनी.

या करारांद्वारे केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञता, तंत्रज्ञानविकास संस्था, शैक्षणिक संस्था आणि प्रशिक्षण केंद्रांचे सहकार्य विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधन कार्याशी जोडण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या वतीने संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. भागीदार संस्थांच्या वतीने IGTR चे महाव्यवस्थापक श्री. आर. डी. पाटील, NGVTC चे व्यवस्थापकीय संचालक इंजि. सी. जे. कारेगावकर, अनावृक्षचे सहसंस्थापक व मुख्य तंत्रज्ञान अधिकारी श्री. संकेत वसंत आघाव, MIT-ADT च्या वतीने डॉ. सानप, श्री. राहुल मडके व श्रीमती नमिता शिंदे, तसेच टँट्रॉनिक्स इंडस्ट्रीजचे संचालक श्री. मिहिर बिडवाई यांनी करारांवर स्वाक्षऱ्या केल्या.

मुरुम वाहतूक रोखणाऱ्या उपविभागीय अधिकाऱ्यांना ढंपरखाली ओढून जीवे मारण्याचा प्रयत्न; तिघांना अटक

देवळाली प्रवरा : अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या उपविभागीय अधिकाऱ्यांनाच ढंपरखाली ओढून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या गंभीर प्रकरणात राहुरी पोलिसांनी संघटित गुन्हेगारीविरोधात मोठी कारवाई केली आहे. राहुरी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हामध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १११ अर्थात संघटित गुन्हेगारीचे वाढीव कलम लागू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज वाहतूक, सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले आणि गुन्हेगारी टोळ्यांच्या वाढत्या मुजोरीला कायद्याचा कठोर इशारा मिळाला आहे.

उपविभागीय अधिकारी विनीत विक्रांत शिर्के हे शासकीय वाहनातून चालकासह मालुंजा येथील शासकीय लिलावातील वाळू गटाची पाहणी करून चिंचोलीकडे जात असताना गंगापूर शिवारात त्यांना विना क्रमांकाचा हायवा ढंपर आढळला. ढंपरची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे सहा ब्रास मुरुम असल्याचे दिसून आले. चालक धनराज चौधरी याच्याकडे मुरुमाची रॉयल्टी व वाहनाची कागदपत्रे मागितली असता, त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे नसल्याचे त्याने सांगितले.

बेकायदेशीर मुरुम वाहतुकीप्रकरणी ढंपर तहसील कार्यालयात कारवाईसाठी नेण्याचे ठरवून अधिकारी स्वतः ढंपरमध्ये बसले. मात्र, पिंपळगाव फुणगी येथे पोहोचताच काही जणांनी मोटारसायकली ढंपरसमोर आडव्या लावून वाहन थांबवले. त्यानंतर ढंपरच्या बाजूचा दरवाजा उघडून उपविभागीय अधिकाऱ्यांना खाली खेचले आणि ढंपरच्या पुढील टायरखाली ओढून त्यांच्या अंगावर वाहन घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. प्रसंगावधान राखत अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या कडेला उडी मारून आपला जीव वाचवला.

हल्लेखोरांनी ढंपर पळवून नेताना संक्रापूर ते लांडेवाडी वस्ती रस्त्यावर मुरुम टाकून वाहतुकीला अडथळा निर्माण केला. सरकारी अधिकारी आणि त्यांच्या चालकाने पाठलाग केला, मात्र आरोपी ढंपर घेऊन पसार झाले.

या प्रकरणात दीपक ऊर्फ प्रविण बबन लाटे (वय ३८, रा. चिंचोली, ता. राहुरी) हा टोळीप्रमुख असल्याचे पोलिसांनी निष्पन्न केले आहे. त्याच्यासह धनराज चौधरी, सतीश रावसाहेब कुदनर (वय ३२, रा. पिंपळगाव फुणगी), तुषार चंद्रकांत जाधव (वय २६, रा. कोल्हार खुर्द), शरद बाळासाहेब भोसले (वय ३६, रा. चिंचोली), दत्ता माळी, अक्षय पवार आणि अर्जुन निकम अशा आठ आरोपींचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाला आहे.

यापैकी धनराज चौधरी, सतीश कुदनर आणि तुषार जाधव यांना अटक करण्यात आली असून, टोळीप्रमुख दीपक ऊर्फ प्रविण लाटे याच्यासह शरद भोसले, दत्ता माळी, अक्षय पवार आणि अर्जुन निकम हे पाच आरोपी अद्याप फरार आहेत. पोलिसांच्या तपासात संबंधित टोळीतील आरोपींविरुद्ध यापूर्वी चोरी, जबरी चोरी, विनयभंग, शासकीय कामात अडथळा, मारहाण, अवैध गौण खनिज चोरी आदी स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. टोळीने आर्थिक आणि भौतिक लाभासाठी संघटितपणे गुन्हेगारी कृत्ये सुरू ठेवली असल्याचे पोलिसांच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे भारतीय न्याय संहिता कलम १११ लागू करण्याचा प्रस्ताव पाठविला होता. अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी प्रस्तावाचे अवलोकन करून आरोपी संघटित टोळीच्या स्वरूपात गुन्हेगारी कारवाया करत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वाढीव कलम लागू करण्यास परवानगी दिली.

संघटित गुन्हेगारीविरोधात कठोर कायद्याचा वापर

भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

तीन आठवड्यांत 975 गुन्हे दाखल, 1383 इसमांविरुद्ध कारवाई, 14 कोटींचा मुद्देमाल हस्तगत

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**दिनांक ०१ ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान पोलीस उपमहानिरीक्षक श्री. शाहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात गुटखा, सुगंधी तंबाखू, अवैध दारू विक्री, जुगार, शस्त्र अधिनियम व इतर कलमांन्वये अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम – ५ राबविण्यात येत आहे.

सदर मोहिमेअंतर्गत दिनांक ०१ ते २१ नोव्हेंबर २०२६ दरम्यान संपूर्ण आठवड्यात नांदेड परिक्षेत्रात खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

भारतीय न्याय संहितेअंतर्गत – ६ गुन्हे.
महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत – १३३ गुन्हे.
महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत – ७०१ गुन्हे.
शस्त्र अधिनियमांतर्गत – १६ गुन्हे.
इतर कलमांन्वये – ११९ गुन्हे.

अशा एकूण ९७५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून, एकूण १३८३ इसमांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच या कारवाईत आरोपींकडून रु. १४,०८,४३,७५९/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

परिक्षेत्रातील विविध घटकांकडून करण्यात आलेली कारवाई
जिल्हा गुन्हे मुद्देमालाची किंमत
नांदेड २७१ रु. ६,००,००,००० पेक्षा अधिक
परभणी २८७ रु. ३,००,००,००० पेक्षा अधिक
हिंगोली २८५ रु. ३,००,००,००० पेक्षा अधिक
लातूर १३२ रु. २,००,००,००० पेक्षा अधिक
एकूण : ९७५ गुन्हे

सदर कारवाईमध्ये पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयातील विशेष पथकाने, लातूर जिल्ह्यातील पोलीस ठाणे लातूर ग्रामीण हद्दीत जुगार, तसेच पोलीस ठाणे शिवाजीनगर, लातूर व परभणी जिल्ह्यातील पोलीस ठाणे गंगाखेड हद्दीतील मटका व जुगाराविरुद्ध केलेल्या कारवाईचा समावेश आहे. अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचविता यावी, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली आहे. या हेल्पलाईनवरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक श्री. शाहाजी उमाप यांनी केले आहे.प्रसिद्धीसाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.

वेरूळचा ऐतिहासिक धार्मिक सोहळा यंदा त्र्यंबकेश्वर येथे 'जनशांती धर्म सोहळा' व 'अमृतकुंभ विश्वशांती महायज्ञा'चे आयोजन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या ३७ व्या पुण्यस्मरणानिमित्त दरवर्षी वेरूळ येथे होणारा भव्य धार्मिक सोहळा यंदा सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे आयोजित करण्यात आला आहे. १४ ते २१ डिसेंबर २०२६ या कालावधीत 'ॐ जगद्गुरू जनशांती धर्म सोहळा' आणि 'अमृतकुंभ विश्वशांती महायज्ञ' पार पडणार असल्याची माहिती वेरूळ येथील आश्रमात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.



आश्रमाचे उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी जगद्गुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ही पत्रकार परिषद झाली. यावेळी जय बाबाजी भक्त परिवाराचे राजेंद्र पवार, राजू चव्हाण शेखनाथ दादा होळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने त्र्यंबकेश्वर येथील जगद्गुरू जनार्दन स्वामी महाराज आश्रमात श्री हृदेश्वर महादेवाच्या सान्निध्यात हा सोहळा होणार आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन महायज्ञाचे दोन टप्पे करण्यात आले असून, १५ ते १७ डिसेंबरदरम्यान नाशिक जिल्ह्यातील, तर १९ ते २१ डिसेंबरदरम्यान इतर जिल्ह्यांतील भाविकांसाठी आयोजन करण्यात आले आहे.

या आठ दिवसीय सोहळ्यात जपानुष्ठान, महिला जप, अखंड नंदादीप, अभिषेक, महायज्ञ, भागवत पारायण, हस्तलिखित जपसाधना, नामसंकीर्तन व श्रमदान असे विविध धार्मिक उपक्रम होणार आहेत. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवार व आश्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.

वाळू माफियांना तहसीलदार सागर वाघमारे यांचा दणका; दोन ट्रॅक्टर जप्त

चिंचवण व देऊळगाव बाजार शिवारात दोन ट्रॅक्टर जप्त

सिल्लोड : तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाळू वाहतुकीविरोधात सिल्लोड तहसील कार्यालयाच्या महसूल पथकाने धडक कारवाई करत दोन ट्रॅक्टर पकडले आहेत. तहसीलदार सागर वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली असून, अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यात अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार तहसीलदार सागर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने गस्त घालून दोन वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचला. यामध्ये चिंचवण शिवारात अवैध वाळू वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर, तर देऊळगाव बाजार शिवारात दुसरा एक ट्रॅक्टर पथकाने रंगेहाथ पकडला.



ही दोन्ही वाहने ताब्यात घेण्यात आली असून, संबंधितांवर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालयामार्फत सुरू करण्यात आली आहे.

या धडक कारवाईत तहसीलदार सागर वाघमारे यांच्यासोबत ग्राम महसूल अधिकारी विशाल दुनगहू आणि महसूल सेवक दुर्गेश गिरी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तालुक्यात यापुढेही अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात अशीच कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा तहसीलदार सागर वाघमारे यांनी दिला आहे.

सिडकोतील विघ्नहर्ता गणेश मंदिरात कार्तिकी एकादशीची महापूजा उत्साहात



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सिडको परिसरातील एन-३ येथील विघ्नहर्ता गणेश मंदिरात कार्तिकी एकादशीनिमित्त महापूजा, अभिषेक, नैवेद्य आणि आरती भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गजाननराव देशमुख आणि त्यांच्या पत्नी शीला देशमुख यांच्या हस्ते विधिवत महापूजा करण्यात आली.

मंदिराचे पुजारी पांडुरंग जोशी यांनी धार्मिक विधी यथासांग पार पाडले. यावेळी गणरायाची आरती करून नैवेद्य अर्पण करण्यात आला. या धार्मिक सोहळ्यास सिडकोतील एन-३, एन-४ तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

राज यादव यांची सेन्सॉर बोर्डाच्या मुंबई सल्लागार मंडळावर नियुक्ती

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : भारतीय जनता पक्षाच्या सोशल मीडिया विभागाचे प्रदेश सदस्य राज यादव यांची केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ अर्थात सेन्सॉर बोर्डाच्या (सीबीएफसी) मुंबई येथील सल्लागार मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या शिफारसीवरून ही नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या एका सामान्य कार्यकर्त्याला महत्त्वाच्या जबाबदारीची संधी मिळवून देत खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी त्यांच्या कार्याची दखल घेतल्याची भावना व्यक्त होत आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ हे देशात चित्रपटांच्या सार्वजनिक प्रदर्शनासाठी प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडते. चित्रपटांचे परीक्षण, त्यातील आशय, सामाजिक परिणाम तसेच प्रेक्षकांच्या दृष्टीने योग्य प्रमाणन यांसारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये मंडळाची भूमिका असते. अशा महत्त्वपूर्ण संस्थेच्या मुंबई येथील सल्लागार मंडळावर राज यादव यांना काम करण्याची संधी मिळाली आहे.

या नियुक्तीमुळे राज यादव यांचे राजकीय, सामाजिक तसेच चित्रपट क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

ऊर्जा सहयोगची सतरावी सर्वसाधारण सभा संपन्न - स्वस्त व स्वच्छ वीज देण्यासाठी सरकारला सहकार्य करण्याचा ठराव

सोयगाव,दि.२२ नोव्हेंबर

छत्रपती संभाजीनगर ऊर्जा सहयोग संस्थेची सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा आज शनिवार, दि.२१ शनिवार रोजी संध्याकाळी ५ वाजता हॉटेल पालखी, शिवाजी चौक, एन-४, सिडको येथे संपन्न झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विलासचंद्र काबरा हे होते. सचिव सुभाष मांगुळकर यांनी सभेचे कामकाज पाहिले. सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. सन.२०२५-२६ चा लेखा परीक्षित अहवाल स्वीकृत करण्यात आला. सन.२०२६-२७ करिता अंतर्गत लेखा परीक्षकांची नेमणूक करण्यात आली.

यावेळी संस्थेचे आजीवन सदस्य सुधाकर तुळापुरकर (वय. ८९) यांचा अध्यक्ष



विलासचंद्र काबरा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सभेत सर्वानुमते असे ठरले की,संस्थेचे आजीवन सदस्य वाढविणे, देणग्या मिळवून आणखी चांगले कार्यक्रम करणे, आणि संस्थेच्या ध्येय धोरणांप्रमाणे स्वस्त व स्वच्छ वीज जनतेला माफक दरात, बाकी राज्यांच्या तुलनेत स्वस्त कशी देता येईल याबद्दल सरकारला सहकार्य करणार.

सभेला मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. आभार प्रदर्शन सहसचिव अंकित काबरा यांनी केले.

स्मशानभूमीत काम करणाऱ्या गायकवाड कुटुंबीयांची शिवसेनेने केली दिवाळी गोड



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : समाजातील प्रत्येकाच्या दुःखात सहभागी होत अहोरात्र सेवा करणाऱ्या स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या उद्देशाने गोगानाथनगर (बेगमपुरा-पहाडसिंगपुरा) येथील शिवसेना शाखा व श्री जय चतुर्थी प्रतिष्ठानच्या वतीने सलग नवव्या वर्षी अनोखा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. दिवाळी पाडवा व भाऊबीजेनिमित्त बेगमपुरा स्मशानभूमीत कार्यरत असलेल्या अन्नपूर्णाताई गायकवाड व त्यांच्या कुटुंबीयांना फटाके, मिठाई, किराणा साहित्य, उटणे, दिवे आदी भेटवस्तू देऊन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली.

नगरसेवक सचिन खैरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना मध्यचे शहरप्रमुख बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते गायकवाड कुटुंबीयांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना उपशहरप्रमुख शेख रब्बानी, सुरेशमामा पवार, प्रमोद मोरे, विलासअप्पा संभाहरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संतोष पवार, विभागप्रमुख योगेश पवार, शाखाप्रमुख गणेश मनगटे, गटप्रमुख गणेश क्षीरसागर, बाळू खेत्रे, विनोद जगताप, पंकज फुटाणे, इंदर फत्तेलष्कर, वैभव लकडे, निहार वाघमारे यांच्यासह शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या नवनियुक्त अशासकीय सदस्यांची बैठक संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : जिल्ह्यातील ग्राहकांचे हक्क व हितसंबंध यांचे संरक्षण करणे, ग्राहकांमध्ये जनजागृती निर्माण करणे तसेच ग्राहकांच्या विविध समस्यांबाबत प्रभावी उपाययोजना करण्यासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या अशासकीय सदस्यांनी प्रशासनाशी समन्वय साधून सक्रियपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य सचिव विलास मुसळे यांनी केले.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, परभणीच्या नवनियुक्त अशासकीय सदस्यांची बैठक जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, परभणी येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत नवनियुक्त अशासकीय सदस्यांचे ग्राहक संरक्षण कायद्यावरील माहिती पुस्तिका भेट देऊन स्वागत करण्यात आले.

बैठकीच्या प्रारंभी विलास मुसळे यांनी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना, उद्दिष्टे, कार्यपद्धती तसेच अशासकीय सदस्यांची भूमिका व जबाबदाऱ्या याबाबत मार्गदर्शन केले.

ग्राहक संरक्षण परिषद ही ग्राहकांच्या हिताचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी कार्य करणारी सल्लागार स्वरूपाची यंत्रणा आहे. सदस्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांच्या समस्या, अडचणी व सूचना परिषदेसमोर मांडाव्यात. ग्राहकांची फसवणूक, वजन-मापातील तफावत, निकृष्ट दर्जाच्या वस्तू, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अडचणी तसेच विविध सेवा पुरविताना येणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधून त्यावर योग्य उपाययोजना सुचवाव्यात, असे त्यांनी सांगितले.

परिषदेच्या नियमित बैठकांमध्ये सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून ग्राहकहिताच्या विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा करावी. प्रशासन आणि अशासकीय सदस्य यांच्यात समन्वय ठेवून ग्राहकांच्या समस्या संबंधित विभागांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. ग्राहकांच्या हक्कांबाबत समाजात जनजागृती करण्यासाठी सर्व सदस्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रांताध्यक्ष तथा जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य विलास मोरे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. ग्राहक

संरक्षणाच्या कार्यात सर्व सदस्यांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

बैठकीस जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे नवनियुक्त अशासकीय सदस्य तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



सोयगाव तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडण्यासाठी शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून कामे करा - आमदार अंबादास दानवे

सोयगाव,दि.२२ नोव्हेंबर

शहरातील गजानन महाराज मंदिर येथील नवनिर्वाचित पद अधिकारी सत्कार व संघटनात्मक मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवसेना नेते तथा आमदार अंबादास दानवे यांच्या हस्ते नविन पद अधिकारी यांच्या सत्कार करण्यात आला.

यावेळी अंबादास दानवे यांनी तालुक्यातील सर्वच विद्यमान नवनिर्वाचित पद अधिकारी यांना कानमंत्र देताना तालुक्यातील गोरगरीब नागरिकांनच्या समस्या सोडविण्यासाठी गावागावांत



जाऊन जनतेचे प्रश्न सोडवायला तत्पर राहवे असे सागितले.

यावेळी.आमदार अंबादास दानवे,राजेंद्र काळे, सुभाष पाटील,विठ्ठल बदर पाटील,रघुनाथ चव्हाण,उपजिल्हाप्रमुख दिलीप मचे, भगवान वारगणे,सोयगाव शिवसेना शहर प्रमुख रविंद्र काटोले,जि प सदस्य सुनिताबाई चव्हाण,चंद्रशेखर चव्हाण,पंचायत समिती सदस्य वैशाली पाटील,सागर पाटील,सुर्यभान गवळी,शेषराव लोखंडे,अनिल गाडेकर,राजेंद्र गव्हाड,भिका पाटील,मयुर गातवे,रमेश पवार, गणेश जाधव,ईश्वर जाधव,बबन रोकडे,मनोज निकम,सुरेश चव्हाण,निलेश पाटील,राजेंद्र मासरे,आन्ना वाडेकर,परशुराम चव्हाण,सागर लाडगे, संतोष बगाब, विश्वनाथ वारगणे, प्रतापदादा राठोड,प्रतापदादा चव्हाण, उपशहर प्रमुख दिपक बागुल, सुरेश फुसे,सुनिल राऊत, योगेश नागपुरे, विनोद पवार, ह.भ.प.जान्हवी सोनवणे,सविता क्षीरसागर, लिलाबाई क्षीरसागर, कलाबाई ,सिमाबाई,अदिसह तालुक्यातील शिवसैनिक पद अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोयगावात 'आनंद अनुभूती शिबिरा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

युवकांचा मोठा सहभाग; तरुणांना नैराश्यापासून दूर ठेवण्यासाठी समर्पण फाउंडेशनचा पुढाकार

सोयगाव, दि.२२ नोव्हेंबर

टीम समर्पण फाउंडेशन आणि द आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने सोयगाव येथे आयोजित पाच दिवसीय 'आनंद अनुभूती शिबिरा'ला शनिवारी (दि.२१) पहाटे उत्साहात सुरुवात झाली. शासकीय रुग्णालयाजवळील सेमिनार हॉलमध्ये दररोज सकाळी ५:३० ते ८:३० या वेळेत हे शिबिर सुरू असून ते २५ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

या शिबिरात सोयगाव, आमखेडा, वरखेडी बु., माळेगाव पिंपरी, शेंदुर्णी आणि गलवाडा या सहा गावांमधून ९४ जण सहभागी झाले आहेत. विशेष म्हणजे यात युवकांचा सहभाग लक्षणीय असून महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, कर्मचारी आणि व्यावसायिक अशा सर्व स्तरांतील नागरिक सहभागी झाले आहेत.



आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ज्येष्ठ शिक्षिका गायत्री भावसार दीदी शिबिरार्थींना मार्गदर्शन करीत असून सह-शिक्षक म्हणून प्रसाद मापारी सहकार्य करीत आहेत. शिबिरात योग, प्राणायाम, ध्यान आणि सुदर्शन क्रिया यांचे प्रशिक्षण दिले जात आहे.

"श्वास हा मन आणि शरीर यांना जोडणारा दुवा आहे. रोज थोडा वेळ प्राणायाम, ध्यान आणि सुदर्शन क्रियेसाठी दिला तर मन शांत राहते आणि ताणतणावाला सामोरे जाण्याची ताकद मिळते. सोयगावकरांचा, विशेषतः तरुणांचा उत्साह पाहून आनंद वाटला," असे गायत्री भावसार दीदी यांनी सांगितले.

"पहाटे साडेपाचची वेळ असूनही सहा गावांतून नागरिक वेळेवर उपस्थित राहत आहेत. ग्रामीण भागातही अशा शिबिरांची गरज आणि ओढ आहे, हे या प्रतिसादातून दिसून आले," असे सह-शिक्षक प्रसाद मापारी म्हणाले.

"आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या काळात तरुणांमध्ये ताणतणाव आणि नैराश्य वाढत आहे. आपल्या गावातील तरुण नैराश्यापासून दूर राहावेत, त्यांचे मन शांत आणि सकारात्मक राहावे, यासाठी समर्पण फाउंडेशनने हा पुढाकार घेतला आहे," असे समर्पण फाउंडेशनचे हर्षल हिंदू यांनी सांगितले.

सोयगावात तब्बल ११ वर्षांनंतर आर्ट ऑफ लिव्हिंगचे असे शिबिर होत आहे. यापूर्वी २०१५ मध्ये येथे तीन शिबिरे झाली होती. शिबिराच्या यशस्वितेसाठी समर्पण फाउंडेशनचे स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

विकास कासलीवाल यांच्या 'दर्या'ची इफ्फीसाठी निवड

'द गोवन डिरेक्टर कट' विभागात लघुपटाला स्थान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : येथील उदयोन्मुख कलाकार विकास कासलीवाल यांनी महत्त्वाची भूमिका साकारलेल्या 'दर्या' या लघुपटाची ५७ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी (इफ्फी) निवड झाली आहे. महोत्सवातील 'द गोवन डिरेक्टर कट' या विशेष विभागात या लघुपटाला स्थान मिळाले असून, २३ नोव्हेंबर रोजी पणजी येथील आयनॉक्स चित्रपटगृहात त्याचे प्रदर्शन होणार आहे.



गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी प्रसिद्ध दिग्दर्शक ओम राऊत यांच्या अध्यक्षतेखालील परीक्षण मंडळाने निवडलेल्या १२ गोमंतकीय चित्रपटांची यादी जाहीर केली. त्यात किशोर अर्जुन लिखित आणि दिग्दर्शित 'दर्या'चा समावेश आहे. सेरेब्रल पाल्सी झालेल्या मुलाचे आयुष्य, भावविश्व आणि त्याच्याशी जोडलेल्या नात्यांतील भावनिक पैलू या लघुपटातून मांडण्यात आले आहेत. यात विकास कासलीवाल यांनी 'बाळू काका' ही महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे.

परवेझ मोमीन यांच्या मोमीन अँड सन्स चॅरिटेबल ट्रस्ट फाउंडेशनने या लघुपटाची निर्मिती केली आहे. यापूर्वी किशोर अर्जुन यांच्या 'घर' या लघुपटातही विकास यांनी भूमिका साकारली होती. सलग दुसऱ्या वर्षी त्यांच्या भूमिकेतील लघुपटाची इफ्फीसाठी निवड झाल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला.

ज्ञानेश्वर मोरे यांचे निधन; आज अंत्ययात्रा



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव;दि.२२ नोव्हेंबर - सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील ज्ञानेश्वर कचरू मोरे(वय-५१) यांचे रविवारी(दि.२२) रात्री आठ वाजून तीस मिनीटांनी निधन झाले.सोमवारी सकाळी दहा वाजता त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुलं,एक मुलगी,एक भाऊ,बहीण असा परिवार आहे.वरठाण येथील पत्रकार भावराव मोरे यांचे ते भाऊ होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सोयगाव येथे शिवस्मारकाचे भूमिपूजन : छत्रपती शिवरायांचे शौर्य, पराक्रम आणि रयतेच्या कल्याणाचे कार्य प्रेरणादायी- विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२२ नोव्हेंबर



छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य,पराक्रम,स्वराज्याची संकल्पना आणि रयतेच्या कल्याणासाठी त्यांनी केलेले कार्य जगासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार आणि आदर्श भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सोयगाव येथे उभारण्यात येणारे स्मारक प्रेरणास्थान ठरेल,असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी केले.सोयगाव नगरपंचायतीच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचा भव्य भूमिपूजन सोहळा रविवारी दि.२२ रोजी उपसभापती सचिन अहिर यांच्या हस्ते,माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.यावेळी फटाक्यांची आतषबाजी,पुष्पवृष्टी, शिवकालीन पारंपरिक वाद्यांचा गजर आणि 'जय भवानी,जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

यावेळी बोलताना उपसभापती सचिन अहिर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून समाजातील प्रत्येक घटकासाठी प्रेरणादायी आहे.त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची स्थापना करताना दाखविलेले धैर्य,दूरदृष्टी, शौर्य आणि रयतेप्रती असलेली बांधिलकी आजही आदर्शवत आहे. महिलांचा सन्मान,सर्वधर्मसमभाव आणि न्यायनिष्ठ राज्यकारभार ही त्यांची शिकवण नव्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सोयगाव येथे त्यांच्या स्मारकाचे भूमिपूजन आपल्या हस्ते होत असल्याचा मनस्वी आनंद आहे. आमदार अब्दुल सत्तार हे मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासोबतच महापुरुषांच्या विचारांना सन्मान देणारी कामे करीत असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, सोयगाव तालुक्याची १९५३ मध्ये स्थापना झाल्यापासून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची मागणी जवळपास पन्नास वर्षांपासून होत होती. निवडणुकीच्या काळात दिलेला शब्द पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण पाठपुरावा केला.राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांनी या प्रस्तावासाठी विशेष लक्ष घालून स्मारकासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला.याबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले.

आज भूमिपूजन झालेल्या स्मारकाचे काम येत्या सहा महिन्यांत पूर्ण करून उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते भव्य अनावरण सोहळा आयोजित करण्यात येईल.हे स्मारक सोयगावच्या वैभवात भर घालण्यासोबतच जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या देश-विदेशातील पर्यटकांसाठीही आकर्षणाचे आणि प्रेरणेचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान,फर्दापूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवपार्क आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम प्रगतिपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. सोयगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये महापुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी आपण पुढाकार घेतला असून,दिवंगत माजी मंत्री स्वर्गीय बाबुराव काळे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी सोयगाव येथे त्यांचा पुतळा उभारण्याकरिता पाठपुरावा करणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

सोयगावच्या पर्यटन विकासासोबतच सिल्लोडच्या धर्तीवर सोयगाव शहरासाठी वॉटर ग्रीड योजनेचा प्रस्ताव मंजुरीच्या स्तरावर असल्याचे सांगत तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे आमदार सत्तार यांनी स्पष्ट केले. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांनी संयम राखून धैर्याने संकटाचा सामना करावा.राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

या ऐतिहासिक भूमिपूजन सोहळ्यामुळे सोयगावकरांची अनेक वर्षांची मागणी पूर्णत्वास येत असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्याचा आणि विचारांचा वारसा जपणारे भव्य स्मारक उभारण्याच्या कामाला आता प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासकीय मदतीसह शिवसेनेचा आधार

सोयगाव येथे आयोजित या कार्यक्रमादरम्यान तालुक्यातील चार शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी एक लाख रुपयांची शासकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली. तसेच शिवसेनेच्या वतीने या कुटुंबांतील महिलांना शिलाई मशीन,कुटुंबातील मुलीला शिक्षणासाठी सायकल आणि जीवनावश्यक किराणा साहित्य देऊन त्यांना आधार देण्यात आला.

याप्रसंगी सिल्लोडचे नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार, सोयगाव च्या नगराध्यक्षा आशाबी तडवी, शिवसेना जिल्हाप्रमुख डॉ. मनोज राठोड, उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे, तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण, सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन पा. गाढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सतीश ताठे, संचालक नंदकिशोर सहारे, डॉ. दिनेश साळवे, दामू अण्णा गव्हाणे, सयाजीराव वाघ, युवा सेनाप्रमुख कुणाल राजपूत, शहरप्रमुख संतोष बोडखे, नगरपंचायतीतील शिवसेनेचे गटनेते अक्षय काळे, नगरसेवक शेख रऊफ, हर्षल काळे, राजू दुतोंडे, दीपक पगारे, संदीप सुरडकर, अक्षय इंगळे, कदिर शहा, नारायण घनगाव, गजानन कुडके, लतीफ शहा, भगवान जोहरे, संध्याताई मापारी, अशोक खेडकर, पंचायत समिती सदस्य सोपानदादा गवांडे, मुख्याधिकारी संभाजी देशमुख, प्रशांत शिरसागर, गोपीचंद जाधव, राजमल पवार, बाबू चव्हाण, सलीम पठाण यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत जोशी आणि ॲड.योगेश पाटील यांनी केले.प्रास्ताविक प्रभाकर (आबा) काळे यांनी तर शेवटी शहरप्रमुख संतोष बोडखे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

चित्रपट चावडीमध्ये 'बॉर्डरलँड्स' माहितीपटाचे प्रदर्शन



छत्रपती संभाजीनगर, दि. २२ : मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशनच्या वतीने आयोजित अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या (AIFF) अंतर्गत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या 'एआयएफएफ राउंड द इयर' या उपक्रमाअंतर्गत दोन दिवसीय चित्रपट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स येथील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात दिग्दर्शक समर्थ महाजन यांच्या 'बॉर्डरलँड्स' या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. या उपक्रमासाठी एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स आणि कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया यांचे विशेष सहकार्य लाभले.

'बॉर्डरलँड्स' हा २०२१ मध्ये प्रदर्शित झालेला सुमारे ६७ मिनिटांचा माहितीपट असून भारतीय उपखंडातील सीमारेषा, मानवी नातेसंबंध आणि सामाजिक वास्तव यांचा वेध या चित्रपटातून घेण्यात आला आहे. भारताच्या पाकिस्तान, नेपाळ आणि म्यानमार या सीमावर्ती भागांतील सहा व्यक्तींच्या जीवनकथा या माहितीपटात मांडण्यात आल्या आहेत. यामध्ये मानवी तस्करीतून बचावलेल्या महिला, तस्करीविरोधात कार्य करणारे कार्यकर्ते, सीमांमुळे विभक्त झालेली कुटुंबे आणि स्थलांतरित व्यक्तींच्या अनुभवांचा समावेश आहे.

सीमा म्हणजे केवळ भौगोलिक किंवा राजकीय विभागणी नसून त्यांचा मानवी जीवनावर, नातेसंबंधांवर, ओळखीवर आणि सामाजिक परिस्थितीवर कसा परिणाम होतो, हे या माहितीपटातून प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले आहे. लिंगभेद, सामाजिक स्तर आणि दिव्यांगत्व यांसारख्या अंतर्गत सामाजिक सीमांचाही या चित्रपटात संवेदनशीलतेने वेध घेण्यात आला आहे. बंगाली, हिंदी, नेपाळी, पंजाबी आणि मणिपुरी अशा विविध भाषांचा समावेश असलेल्या या माहितीपटाला उत्कृष्ट संकलनासाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

पालम येथे 28 नोव्हेंबरला शासकीय सेवा योजनांचा महामेळावा

कायदेविषयक महाशिबिराचे आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार परभणी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पालम तालुका विधी सेवा समिती तसेच जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पालम येथील गजानंद मंगल कार्यालय येथे विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. महामेळाव्यामध्ये समाजातील इतर दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे. परभणी जिल्ह्यातील विविध शासकीय व निम शासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबत माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या महाशिबीरात विविध शासकीय विभांगाचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमुर्ती तथा परभणी जिल्ह्याचे पालक न्यायाधीश सचिन एस. देशमुख यांच्या हस्ते महाशिबिराचा उद्घाटन होणार आहे. परभणी जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आर. एम. सादराणी यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. परभणी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर यांच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे. परभणी जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन परभणी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव भुषण काळे आणि पालम वकील संघाचे अध्यक्ष श्याम आर. रोकडे यांनी केले आहे.

कन्नड, वैजापूर, रत्नापूरमध्ये शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सत्कार

अंबादास दानवेंकडून संघटनात्मक बांधणीचा आढावा; गावपातळीवर पक्षविस्ताराचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कन्नड, वैजापूर व रत्नापूर तालुक्यांतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. यावेळी पक्षाची संघटनात्मक बांधणी, आगामी काळातील राजकीय वाटचाल, गावपातळीवरील पक्षविस्तार आणि स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. शिवसेना नेते तथा आमदार अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला पक्षाचे उपनेते सुभाष पाटील उपस्थित होते.

शिवसैनिकांनी गावागावांत पक्षाचे काम अधिक सक्रियपणे करावे, सर्व समाजघटकांना सोबत घेऊन संघटनात्मक ताकद वाढवावी, तसेच आगामी निवडणुकांच्या दृष्टीने आतापासून तयारीला लागावे, असे आवाहन अंबादास दानवे यांनी केले.

यावेळी उपनेते सुभाष पाटील, उपजिल्हाप्रमुख संजय पिंपळे, रमेश सावंत, तालुकाप्रमुख संजय मोटे, मनाजी पाटील मिसाळ, राजू वरकड, केतन काजे, कल्याण चव्हाण, मनोज गायके, संजय निकम, गणेश अधाने, उमेश मोकासे, विठ्ठल डमाळे, अक्षय साठे, पद्मा शिंदे, योगेश पवार, शहरप्रमुख मुकेश मालोदे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

गंगापूर, ग्रामीण व पैठणमध्ये आज बैठका

दरम्यान, अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी गंगापूर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण आणि पैठण विधानसभा क्षेत्रात संघटनात्मक बैठका होणार आहेत. सकाळी १० वाजता गंगापूर, दुपारी १ वाजता छत्रपती संभाजीनगर ग्रामीण आणि दुपारी ४ वाजता पैठण येथे या बैठका पार पडतील.

बैठकांना शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सहसंपर्कप्रमुख अनिल चोरडिया, राजेंद्र काळे, जिल्हा संघटक डॉ. सुनील शिंदे, उपजिल्हाप्रमुख अंकुश सुब, अशोक शिंदे, तालुकाप्रमुख अविनाश पाटील, सुभाष कानडे, मनोज पेरे, आनंद भालेकर, शंकर ठोंबरे, युवासेना जिल्हाधिकारी विठ्ठल डमाळे, शुभम पिवळ, महिला आघाडी जिल्हा संघटक राखी परदेशी आणि पद्मा शिंदे यांनी केले आहे.

विद्युत खांबावर काम करणाऱ्या कामगाराचा मृत्यू

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी**विद्युत खांबावर काम करत असताना विजेचा धक्का लागून कामगाराचा मृत्यू झाला या प्रकरणात दिनांक 17 मार्च 2026 रोजी पिंपळदरी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती परंतु या तपासात या प्रकरणात कामगाराचा मृत्यू सुरक्षा साधनाचा अभाव व निष्काळजीपणामुळे झाल्याचे निष्कर्ष पुढे आले आता या प्रकरणात मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी कंत्राटदार दिनेश जाधव व विस्तार तंत्रज्ञ सतीश गायकवाड यांच्यावर 19 नोव्हेंबर 26 लापिंपळदरी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे तपासी पोलीस अमलदार साहेबराव मस्के यांनी तक्रार दिली आहे मार्च महिन्यात अकस्मात मूर्तीची नोंद झाली होती व विजेचा धक्का लागून प्रशांत मल्हारी देवरे यांचा मृत्यू झाला होता सदर प्रकरणात तपास करताना विद्युत खांबावर काम करत असताना संबंधित मजुराला आवश्यक सुरक्षा साधन उपलब्ध करून देण्यात आले नव्हते घटना घडल्यानंतर देखील तंत्रज्ञाने घटनास्थळी भेट दिली नाही व मजुराच्या मृत्यू मागे सुरक्षा साधनाचा अभाव व निष्काळजी पण आहे कारणी पुढे आली प्रशांत देवरे यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी ठेकेदार दिनेश मारोतराव जाधव विजतंत्रज्ञ सतीश बाबुराव गायकवाड या दोघां जनावर मृत्यूचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे

डोक्यात दगड घालून खून

अपघाताचा बनाव रचून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

अहिल्यानगर : नगर तालुक्यातील रतडगाव शिवारात एकाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली . या घटनेनंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह रतडगाव येथील पुलाखाली टाकून अपघाताचा बनाव रचण्याचा प्रयत्न करण्यात आला . सुभाष बाबासाहेब जगताप (वय ३५, रा. रतडगाव, ता. जि. अहिल्यानगर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. रतडगाव परिसरात घडलेल्या या खून व पुरावा नष्ट करण्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.या प्रकरणी फिर्यादी युवराज अंबादास जगताप (वय २८, मूळ रा. रतडगाव, सध्या रा. केडगाव) यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी अमोल सोपान जाधव (रा. रतडगाव, ता. जि. अहिल्यानगर) या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.



कलारीप्पायट्टूच्या राज्यस्तरीय स्पर्धेत ढोरेगावच्या खेळाडूंची चमक

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड, जिल्ह्यातील खेळाडूंचीही पदकांची लयलूट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : पारंपरिक भारतीय युद्धकला असलेल्या कलारीप्पायट्टूच्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगावच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. शाळेच्या सुमेरा शब्बीर शेख आणि प्रतीक्षा राहुल आल्हाट या दोन विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. विशेष म्हणजे, ढोरेगाव शाळेच्या सात खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत विविध पदकांची कमाई केली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळवलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा गुणवत्तेचा गौरव झाला आहे.

सातारा येथे २२ नोव्हेंबर २०२६ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मराठी कलारीप्पायट्टू असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने १७ व १९ वर्षाखालील मुला-मुलींच्या गटात स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेसाठी ढोरेगाव शाळेतील सुमेरा शब्बीर शेख, प्रतीक्षा राहुल आल्हाट, माहीम युनूस पठाण, मारिया अनिस शेख, रोशनी रवी आढागळे, आदित्य किशोर उमाप आणि फरहान नयुम शेख या सात खेळाडूंनी पात्रता मिळवली होती. चूवडूकल, मयपटू या वैयक्तिक प्रकारांसह नेदिवाडीपयटू या सांघिक प्रकारात खेळाडूंनी कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले.

जिल्ह्यातील खेळाडूंची पदकांची कमाई

राज्यस्तरीय स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध वयोगटांत पदके मिळवली. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सुमेरा शब्बीर शेख आणि प्रतीक्षा राहुल आल्हाट यांनी सुवर्णपदक, स्वरा चंद्रकांत थोरात हिने रौप्यपदक, तर मुस्कान फजल शहा हिने कांस्यपदक पटकावले. मुलांच्या गटात आदित्य सुनील विरासे आणि अविष्कार विठ्ठल विरासे यांनी रौप्य, तर सोहम सुनील पारिपल्ली आणि उत्कर्ष गोविंद वाघमारे यांनी कांस्यपदक मिळवले.

१९ वर्षाखालील मुलींच्या गटात माहीम युनूस पठाण आणि मारिया अनिस शेख यांनी रौप्य, तर रोशनी रवी आढागळे हिने कांस्यपदक पटकावले. याच वयोगटातील मुलांच्या गटात अंश युवराज झाल्टे याने सुवर्ण, रुपेश राहुल जायवाळ याने रौप्य, तर आदित्य किशोर उमाप आणि फरहान नसीर शेख यांनी कांस्यपदक मिळवले.

खेळाडूंना प्रशिक्षक अली बाकोदा, सुमीत खरात, बंटी राठोड, शेख मुदस्सीर आणि उदय तगरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी राजेश हिवाळे, मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, मुग्धा निमसे, नीलिमा कुलकर्णी, परमेश्वर मस्के, अली बाकोदा, शामीर शेख, सचिन पाटसकर आणि कल्याणी जगताप यांनी विशेष पुढाकार घेतला.

खेळाडूंच्या यशाबद्दल सरपंच रजियाबी अयुब पटेल, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलिल पटेल, उपाध्यक्ष अशोक कांबळे, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव, केंद्रप्रमुख सचिन डमाळे, केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुन्हे, जिल्हा क्रीडाधिकारी मुकुंद वाडगावकर, क्रीडाधिकारी खंडू यादवराव, रामा मायंदे, गणेश मालोदे, रेखा परदेशी, मराठी कलारीप्पायट्टू महाराष्ट्र असोसिएशनचे अध्यक्ष धुमाळे, सचिव बी. एस. राठोड, छत्रपती संभाजीनगर असोसिएशनच्या अध्यक्ष राजलक्ष्मी भाजीभाकरे, सचिव राहुल जैन आणि कोषाध्यक्ष पंकज राठोड यांच्यासह पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सुमेरा शेख आणि प्रतीक्षा आल्हाट यांच्याकडून आता राष्ट्रीय स्तरावरही पदकांची अपेक्षा व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली क्रीडा गुणवत्ता आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करू शकतात, हे ढोरेगावच्या खेळाडूंनी दाखवून दिले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911